# हुंडयाला विरोध घरापासून सुरुवात

आमच्या घराला प्रतिगामी तशीच पुरोगामी पार्श्वभूमि लाभलेली, आजोबांना 'जाती' टाकून पोटं भरलेली. तर वडिलांनी सावकारी करून बऱ्याच दीन–दुबळयांना लुबाडून घरातली गरिबी कमी केली. एका बालविधवेशी लग्न करून 'सात पाट पाडावीत पण एक पाट लावू नये' ही विधवा–रूढी वडिलांनी झुगारलेली. त्यामुळं आम्हा सगळया भावंडांना मुहूर्ताच्या बाईचे म्हणून खानदानी देशमुखी परंपरेत तळाचं स्थान आहे.

धाकटया भावानं स्वतःचं लग्न स्वत: ठरवलं आणि घरची–नात्यातली मंडळी खवळून उठली. आमच्या खेडेगावात 'लग्न ठरवणं' हा अधिकार अजून मुलालाही नाही तिथं मुलीची काय कथा? आधीच शिक्षणाचा अभाव त्यामुळं 'स्वत: स्वतःचंच लग्न ठरवणं' या गुन्ह्याखाली (?) भावावर बरीच दडपणं आणली. पण भाऊ निश्चयानं ठाम. आधीच आम्ही 'मुहुर्ताच्या बाईचे' म्हणून कमी प्रतिचे समजण्यात येणारे, त्यामुळे मुलगी इकात घ्याऽची पाळी आली तरी चालेल. पण करायची तं देशमुखाचीच अशी प्रतिज्ञा केलेली. बरं सध्या घराचा कारभार थोरल्या भावाकडं त्यामुळं धाकटा भाऊ पेचात पडला.

मी आमच्या गोतावळयात अपवाद म्हणून जरा जास्त शिकलेलो. मलाच घरी जाऊन थोरल्या भावांना स्पष्ट सांगावं लागलं. "आपल्याला या 'खानदानी' स्पर्धेत उतरायचं नाही." त्यावर थोबाडीत बसल्यागत थोरले भाऊ गप्प बसले. मला पुण्याला यायची घाई होती. निरोप देताना धाकटा भाऊ म्हणाला, 'भाऊ कसं करू?' मी स्पष्ट सांगितलं 'खंबीर रहा. मात्र हुंडा घेऊ नको.'

माझी एम्. एस्सी ची परीक्षा सुरु झाली. अभ्यासाचा बोजा वाटू लागला तसा आजारही जोर करू लागला. डॉक्टरांनी तातडीच्या शस्त्रक्रियेचा सल्ला दिला. पण मला हाताशी आलेल्या परिक्षेचा मोह आवरला नाही. तशात घरून निरोप आला. 'धाकटया भावाचं त्याच्या अपेक्षीत स्थळी जमलं. हुंडा बारा हजार.

धडा मॅट्रीकइतकंही शिक्षण नाही. तशात एक हात अधू. तरीही इतका हुंडा बारा हजार. अगदी अस्वस्थ झालो.

माझी थोरली बहीण अपुऱ्या हुंडयामुळं ऐन गरोदरपणात विषबाधा करवून काही वर्षांपूर्वी तिच्या सासरच्या मंडळींनी मारली होती.

तेव्हा महिनाभर रडून रडून आकांत करणारे माझे आईवडील. तेच आज आपल्या मुलाचा एवढा हुंडा घेऊ बघतात. ज्या मुलीशी लग्न जमलं तिला खूप शिकायची इच्छा होती सध्या ती कुठ नववीपर्यंत आली होती. पण मुलीच्या भावानं दोन वर्षापूर्वी कर्जबाजारापायी आत्महत्या केलेली. तशात त्या घरावर एवढया हुंडयाचा बोजा लादला जातोय. मी अगदी सुन्न होत गेलो आणि एकदाचा निर्णय घेतला आपण आता घरच्यांच्या विरोधात उभं राहिलं पाहिजे.

घरी हुंडा न घेण्याविषयी आई–वडीलाना पत्रानं कळविलं, त्यात 'हुंडयाअभावी आपण एक पोटचा गोळा आधीच गमावलाय आणि हा हुंडा घेतला तर मी आपणाला पारखा होईन.' असा खुलासा केला. पण परिणाम शून्य. अगदीच बेचैन झालो. आधीच एम्. एस्सी. वार्षिक परीक्षा. त्यात आजार आणि शस्त्रक्रिया अनिवार्य. तरीही घरच्यांच्या विरोधात उभं राहिलंच पाहिजे असं वाटू लागलं. कारण क्रांती स्वतःच्या घरापासूनच सुरू करायची असते ना?

संगमनेरच्या सगळया पुरोगामी संघटनांना धडाधड पत्रं लिहून 'दि. ३१ मे हुडाविरोधी निषेध मोर्चा लग्नस्थळी न्यायाचा आहे. तयारी ठेवा' असं कळवलं. पुण्यातल्याही वेगवेगळया संघटनांशी संपर्क साधला. मी घरातच विद्रोह करतोय म्हणल्यावर बऱ्याच कार्यकर्त्यांचा पाठिंबा तर काहींची सहानुभूतीही मिळत होती. काहीजण मात्र 'बावळटा एव्हढी टोकाची भूमिका घेऊ नको' म्हणून निषेधापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत होते.

सोमवार दि. २४ मे रोजी एक महत्वाची खबर मिळाली आणि मी बेचैन अवस्थेतही बावरलो, 'मुलगी

एका रक्तपित्ती मुळं गावानं वाळीत टाकलेल्या कुटुंबातली आहे.' त्याच दिवशी सदर प्रकार मी विषमता निर्मुलन समितीच्या साप्ताहिक बैठकीत मांडला त्यावर हे लग्न होतय एवढंच समाजकार्य पुरेसं. मोर्चाच्या निमित्तानं होत असलेली तडजोडही होणार नाही. असे मत पडले. या विद्रोहानं स्वागत करून बाबांनी आढाव्यांनी मला 'या' गोष्टीपासून परावृत्त राहण्याचा सल्ला दिला. पुण्यातल्या व संगमनेरच्या सर्व कार्यकर्त्यांना नकार कळविला. या सगळ्या खटपटीत माझे दोन पेपरही बुडाले. दि. २८ मे रोजी परिक्षा आटोपली. त्यावर मात्र लग्नात 'हुंडाविरोधी पोस्टर प्रदर्शन' दाखवून मूक प्रतिकार करण्याचा बेत केला. मर्यादित पोस्टर्ससह दि. ३० मे ला संगमनेर गाठलं. संगमनेरचे सगळे कार्यकर्ते पांगलेले. बरेचजण कुणा जवळच्या मित्राच्या किंवा नातेवाईकाच्या लग्नासाठी 'राखीव' होते. त्यामुळं मला पोस्टर्स प्रदर्शनासाठी दहा कार्यकर्तेही मिळू शकले नाहीत.

मग मात्र समता युवा संघटनेच्या वतीनं 'हुंडा देऊ नका' हे निषधपत्रक लग्नापूर्वी वाटले आणि वधू-वराला 'उपरा' + निषेधपत्रक सप्रेम भेट म्हणून दिली. अशा प्रकारे मूक-निषेध नोंदवून लग्नाआधीच आम्ही संगमनेर भागातल्या इतर लग्नाचा मूक-निषेध (हुंडा-विरोधी) नोंदविण्यास निघून गेलो.

मी लग्नाला नसल्यानं नातेवाईक व गावकरी मंडळीत बरीच उलटसुलट चर्चा झाली. बऱ्याच अफवाही उठल्या. त्यातल्या काही अफवा अशा –

१) आधी धाकटयाचं लग्न केल्यानं अशोक रुसला व्हता.

२) 'ही' पोर करायची अशोकच्या मनात व्हती.

३) रोगट मुलगी म्हणून अशोकचा लग्नाला विरोध व्हता.

४) अशोकची परिक्षा चालू व्हती.

मात्र बऱ्याच लोकांनी या अफवांवर अविश्वास 'हुंडाविरोधी पत्रक दाखवून' प्रगट केला आणि दाखवून दिलं की हुंडा घेतल्यामुळं 'अशोक' धुमसत होता.

**– अशोक फटांगरे**

## कॉ. शांताबाई कुलकर्णी स्मृति पारितोषिकाच्या मानकरी श्रीमती यशोदाबाई पाटील

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये तुरुंगवास पत्करलेल्या व स्वातंत्र्योत्तर काळांतही कष्टकऱ्यांच्या आंदोलनामध्ये सातत्याने सक्रिय भाग घेणाऱ्या कॉ. मुक्ताबाई कुलकर्णी यांच्या स्मृति-दिनानिमित्त दरवर्षी ता. ७जून रोजी प्रसिद्धीच्या झोतामध्ये नसलेल्या कार्यकर्तीला २०० रुपयांचे पारितोषिक दिले जाते.

यंदाचे वर्षी कराड जवळील तांबवे गावच्या श्रीमती यशोदाबाई पाटील यांना हे पारितोषिक देण्यात आले. श्रीमती यशोदाबाई यांचे सर्व घर १९३० सालापासून राष्ट्रीय चळवळीशी संबंधित होते. साहजिकच १९४२ च्या 'प्रति-सरकार'च्या आंदोलनामध्ये त्यांच्या दोन बंधूंसह त्यांनी पुढाकाराने भाग घेतला. गुप्तजागी निरोप पोचविण्यापासून शस्त्रे सांभाळण्यापर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी, प्रसंगी पुरुष रूप धारण करूनही मोठ्या धाडसाने पार पाडल्या. त्यांच्या एका बंधूंना अटक झाल्यावर त्यांनीही पोलिसांच्या स्वाधीन व्हावे म्हणून त्यांच्या वृद्ध आई-वडिलांना तुरुंगांत टाकले. परंतु श्रीमती यशोदाबाई त्यांच्या इतर भूमिगत सहकाऱ्यांप्रमाणे अखेरपर्यंत पोलिसांच्या हाती लागल्या नाहीत.

स्वातंत्र्योत्तर काळांत त्यांच्या भागांत झालेल्या आपसातील हत्याकांडाचा उबग येऊन श्रीमती यशोदाबाई यांनी आचार्य विनोबा भावे यांच्या सर्वोदय चळवळीला वाहून घेतले. आजही त्या हे कार्य यथाशक्ती करित आहेत. न कळलेल्या वयात परित्यक्ताचे जीवन जगण्याचे नशिबी आलेली ही ग्रामीण भगिनी मुळूमुळू रडत बसली नाही. तर देशाचे स्वातंत्र्य हाच आपला संसार मानून समर्पित जीवन जगली. याच कारणाने श्रमिक महिला समितीतर्फे त्यांना शांताबाई कुलकर्णी पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

शांता रानडे